बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → बुधवार दि १५ जुलै२०२६ → वर्ष १० वे → अंक -११ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Wensday Date: 15 July 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# सिव्हिलमध्ये काय गोंधळ चाललाय ?

**लोकनायक वृत्तसेवा –** येथील जिल्हा रूग्णालयाच्या कारभाराविषयी दररोज नवे गैरप्रकार समोर येऊ लागले आहेत. महिला रूग्णांना कधी झोळीत तर बाळंतिणीला कधी उचलून वरच्या मजल्यावर घेऊन जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर आता जिल्हा रूग्णालयातील एक कर्मचारी ड्युटीवर असतांना चक्क दारू ढोसून आल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे शल्यचिकित्सक डॉ.सतिशकुमार सोळंके यांनी घेतलेल्या वार्डाच्या राऊंडमध्येच हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने डॉ.सोळंके यांनी सदरील कर्मचाऱ्याला तडकाफडकी कार्यमुक्त केले आहे. दरम्यान जिल्हा रूग्णालयातील कारभारावर कोणाचाच वचक न राहिल्यानेच असे प्रकार होऊ लागले आहेत. त्यामुळे सिव्हील सर्जन म्हणून डॉ.सोळंके यांना स्वत: जिल्हा रूग्णालयाच्या काराभारामध्ये लक्ष घालणे आवश्यक आहे अशा प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या आहेत. बीड जिल्हा रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.सतिशकुमार सोळंके यांनी काल रात्री ११ वाजण्याच्या सुमारास वार्ड क्र.४८ मध्ये राऊंड घेतला. त्यावेळी कर्तव्यावर असलेले कंत्राटी अधिपरिचारिका किरणकुमार अनिल लोंढे यांनी वैद्यकीय



सल्ल्यानुसार रूग्णांना दिलेल्या उपचाराबाबत असमाधानकारक माहिती दिली. त्याचबरोबर ते कर्तव्यावर मद्यप्राशन करून आले होते असेही डॉ.सोळंके यांच्या निर्दशनास आले. त्याची दखल घेत रूग्णसेवेतील कर्तव्याप्रती निष्काळजीपणा, असभ्य वर्तन दिसुन आल्याने संबंधित कर्मचारी लोंढे यास आज तडकाफडकी कार्यमुक्त करण्यात आले आहे. या घटनेनंतर शल्यचिकित्सक डॉ.सोळंके यांनी आज जिल्हा रूग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी कर्मचाऱ्यांची चांगलीच कान उघडणी केली असुन कडक शब्दात तंबी देखील दिली आहे. रूग्णांची सेवा आणि त्यांचे आरोग्य हीच आपली पहिली प्राथमिकता आहे, रूग्णसेवेत कोणताही निष्काळजीपणा, ड्युटीवर मद्यप्राशन करणे किंवा असभ्य वर्तन यापुढे अजिबात खपवून घेतले जाणार नाही अशा सुचना त्यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या. असा पान २ वर

## सर्व सर्जिकल वार्ड ग्राऊंड फ्लोअरला आणले डॉ.सोळंके ॲक्शन मोडमध्ये पण सातत्य कायम ठेवा



**जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतिशकुमार सोळंके ॲक्शनमोडमध्ये आले आहेत. रूग्णसेवा हीच आपली पहिली प्राथमिकता असल्याच्या सुचना सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. वरच्या मजल्यावर असलेले सर्व सर्जिकल वार्ड ग्राऊंडफ्लोअरला (खाली) आणण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. त्याचबरोबर मुस्कान शेख या महिलेच्या मृत्यू प्रकरणा संदर्भात चौकशी समिती नेमली आहे, त्याबाबतची चौकशी सुरू असून जो कोणी दोषी आढळेल त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही आणि नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल असे डॉ.सोळंके यांनी स्पष्ट केले. दरम्यान डॉ.सोळंके यांनी जिल्हा रूग्णालयाचा कारभार सुधारण्याकडे लक्ष केंद्रीयत करत ॲक्शन मोडमध्ये येण्याची घेतलेली भुमिका कौतूकास्पद आणि सर्व सामान्य रूग्णांना समाधान देणारी आहे. डॉ.सोळंके साहेब आता हेच सातत्य कायम ठेवा अशी अपेक्षा आहे.**

## बीड जिल्ह्यावर भर पावसाळ्यात कोरड्या दुष्काळाची छाया मायबाप सरकार दाखवील का थोडी माया

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व सहका-यांचे प्रशासनास निवेदन




**लोकनायक वृत्तसेवा –** बीड जिल्ह्यातील व परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले असून या वर्षी खरीप हंगामाला उशीर झाला, जूनच्या शेवटच्या टप्प्यात पावसाचे आगमन झाल्याने सर्व शेतकऱ्यांनी कर्ज काढून व उसनवारी करून अत्यंत महागडी बियाणे आणि खते खरेदी करून पेरण्या पूर्ण केल्या, परंतु पेरणीनंतर लगेचच पावसाने दीर्घकाळ दडी मारल्यामुळे (खंड पडल्यामुळे) जमिनीतील ओलावा पूर्णपणे नाहीसा झाला आहे. परिणामी, उगवून आ-लेली पिके आता करपून जळून चालली आहेत. पावसाअभावी शेतातील पिके नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा दुबार पेरणीचे मोठे संकट ओढावले आहे. सुरुवातीलाच बियाणे व खतांवर मोठा खर्च झाल्याने आता पुन्हा दुबार पेरणीसाठी लागणारा पान २ वर

## २०कि.मी. अंतरातील,चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्याची मागणी!

लोकनायक वृत्तसेवा
केज जवळील उमरी टोल नाका (प्लाझा) परिसरातील २० किलोमीटर अंतरातील,चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्यात यावी. या मागणीसाठी उमरी टोल नाक्यावर स्थानिक शेतकरी, वाहन चालक, मालक यांचे वतीने काल चक्काजाम आंदोलन करण्यात आले. परंतु महसूल प्रशासन व पोलीस




प्रशासनाच्या मध्यस्थीने सदरील आंदोलन हे आंदोलनकर्त्यांनी तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील उमरी शिवरतील केज-बीड राज्यमहामार्गावर भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाच्या वतीने एचपीएम कंपनी मार्फत टोल नाका सुरू आहे. सदरील टोल नाक्यापासून वीस किलोमीटर अंतरावरील स्थानिक चार चाकी वाहने, शेतकऱ्यांचा शेतीमाल वाहून नेणारे वाहने पान २ वर

## प्रभाग क्रमांक ७ मधील वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येबाबत महावितरणकडे निवेदन

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नगरसेवक जगदीश गुरखुदे व नगरसेविका सौ. भाग्यश्री सागर देशपांडे यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंता श्री.राजपुत साहेब यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सावरकर शाळा परिसर, चुन गल्ली डीपी, सराफ रोड, बोबडेश्वर गल्ली, छापखाना गल्ली, थिगळे गल्ली, जटाशंकर गल्ली, झेंड गल्ली, काळे गल्ली व



माजी आमदार देशमुख गल्ली या भागात नदीपात्रातून जाणाऱ्या वीजवाहिन्या, झाडांच्या फांद्या तसेच डीपीवरील वाढता ताण यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे.
या समस्येमुळे नागरिक, विद्यार्थी, पान २ वर

## आईच्या कष्टाचे चीज, नेकनूरचा प्रतीक शिंदे बनला डॉक्टर

### पहिल्याच प्रयत्नात एफएमजीई परीक्षेत घवघवीत यश

**लोकनायक वृत्तसेवा**
आईच्या अपार कष्टाचे अखेर चीज झाले असून, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर नेकनूर येथील प्रतीक ज्योती महादेव शिंदे याने वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. फिलीपिन्स देशातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून त्याने डॉक्टर होण्याचे आपले स्वप्न साकार केले आहे. या यशामुळे संपूर्ण बीड जिल्ह्याचे नाव उज्वल झाले असून, शिक्षणातही जिल्हा अग्रेसर असल्याचे या भूमिपुत्राने दाखवून दिले आहे.



प्रतीक शिंदे याचे मूळ गाव बीड तालुक्यातील नेकनूर हे आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण नेकनूरमध्येच पूर्ण झाले. त्यानंतर त्याने आईच्या पान २ वर

## विजेच्या वारंवार खंडित पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; तातडीने उपाययोजना करण्याची महावितरणकडे मागणी

**लोकनायक वृत्तसेवा**
बीड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीज पुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून, या प्रश्नावर तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी भाजप गटनेते तथा स्थायी समिती सदस्य जगदीश गुरखुडे यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.१४ जुलै रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक ७ मधील नदीजवळील सावरकर शाळा, चुनगल्ली डीपी परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. नदीपात्रातून गेलेल्या वीजवाहिन्या, झाडांच्या फांद्या आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे लाईट सतत बंद पडत असल्याचे महावितरणकडून सांगितले जात असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.या वारंवारच्या वीज खंडित होण्यामुळे नागरिक, लहान मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रात्रीच्या वेळी अंधारामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सराफ रोड, बोबडेकर गल्ली, छायाचाना गल्ली, शिंगळे गल्ली, जयशंकर गल्ली, झेंड गल्ली, काळे गल्ली तसेच माजी आमदार देशमुख गल्ली या भागातील नागरिक नियमितपणे वीजबिल भरत असतानाही पान २ वर

## यवतमाळमधील वाढत्या गुन्हेगारीविरोधात चांदोरे नगरचे नागरिक आक्रमक; पोलीस प्रशासनाला दिले निवेदन, चौकीची केली मागणी

**लोकनायक वृत्तसेवा :** शहरातील वाढती गुन्हेगारी, चोऱ्या आणि टवाळखोरांचा वाढता उपद्रव या पार्श्वभूमीवर आज दिनांक १४ जुलै २०२६ रोजी चांदोरे नगर येथील नागरिकांनी पोलीस प्रशासनाची भेट घेऊन आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. 'पोलीस हक्क संघर्ष संघटना' विदर्भ अध्यक्ष मनिषा तिरणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व नेतृत्वात हे शिष्टमंडळ यवतमाळ पोलीस प्रशासनाला भेटले. वाढत्या गुन्हेगारीवर सविस्तर चर्चा या भेटीदरम्यान चांदोरे नगर आणि परिसरात गेल्या काही दिवसांत घडलेल्या गुन्हेगारी घटनांवर पोलीस प्रशासनासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. रात्रीच्या वेळी होणारी पोलिसांची गस्त



वाढवण्यात यावी, महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी विशेष पावले उचलली जावीत, अशी आग्रही मागणी नागरिकांनी केली. परिसरातील शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई करावी, अशी मागणी मनिषा तिरणकर यांनी याप्रसंगी बोलताना केली. नवीन पोलीस चौकीची प्रमुख मागणी चांदोरे पान २ वर

## यवतमाळ शहरात नियमांची होळी; ३०० हून अधिक अनधिकृत होर्डिंग्जमुळे नगर परिषदेचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला?

**लोकनायक वृत्तसेवा :** यवतमाळ शहरातील मुख्य रस्ते, रस्ता दुभाजक (डिवायडर्स) आणि विद्युत पोलवर 'व्हाईट गोल्ड प्रमोशन्स' या एजन्सीने शहराचे विद्रुपीकरण करत तब्बल ३०० पेक्षा जास्त अनधिकृत होर्डिंग्ज (बॅनर्स) लावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नगर परिषदेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील (छजउ) अटी व शर्तींचे सर्रास उल्लंघन झाले असतानाही, गेल्या १० महिन्यांपासून पालिका प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. यामागे संबंधित अधिकारी आणि जाहिरातदार यांच्यात मोठे आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, याप्रकरणी आता थेट




जिल्हाधिकारी आणि सह आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.काय आहे संपूर्ण प्रकरण ?'व्हाईट गोल्ड प्रमोशन्स'च्या प्रोप्रायटर वैष्णवी अ. बासटवार (रा. पाटण, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ) यांनी १ जुलै २०२५ रोजी यवतमाळ नगरपालिकेकडे होर्डिंग्ज लावण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार नगर परिषदेने २ जुलै २०२५ रोजी केवळ २४० जाहिराती लावण्याचे ना-हरकत प्रमाणपत्र दिले. मात्र, प्रत्यक्षात शहरात निर्धारित संख्येपेक्षा कितीतरी अधिक, म्हणजेच ३०० हून अधिक होर्डिंग्ज ठिकठिकाणी ठोकण्यात आले आहेत. यामध्ये नगर परिषदेच्या काही अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करून ही परवानगी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या प्रमुख मार्गांवर अनधिकृत होर्डिंग्जचा पान २ वर

दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## छत्रपती संभाजीनगर येथे २०२६ चा लोकमत बीड भूमिपुत्र पुरस्कार सोहळा संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा**
दैनिक लोकमत परिवाराच्या वतीने देण्यात येणारा लोकमत बीड भुमिपुत्र २०२६ चा पुरस्कार हा नुकताच बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जाहिर करण्यात




आला होता. या पुरस्काराचे वितरण सोमवार रोजी छत्रपती संभाजी नगर येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये केज शहरासह तालुक्यातून केजच्या प्रथम नागरिक तथा केजच्या नगराध्यक्षा डॉ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केज नगरपंचायतचे गटनेते डॉ. पान २ वर

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर
ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर, ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.



पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदीर रोड बीड

लोकनायक
बुधवार दि १५ जुलै२०२६
२

## जाहीर नामा

**श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क.१३४/२०२६**
**निशाणी क.१०/क**

१. रामकृष्ण पिता चंद्रसेन सिरसट वय ३६ वर्षे धंदा शेती य गांजपुर ता धारूर जि बीड
२. महादेव पिता चंद्रसेन सिरसट वय ३० वर्षे धंदा शेती रा गांजपुर ता धारूर जि बीड

**) अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही ) सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळिवण्यात येते की, ज्या पेक्षा मयत वंदना भ्र चंद्रसेन सिरसट रा. गांजपुर ता धारूर जि बीड यांचे दिनांक २६/०२/२०२६ रोजी निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. मयत वंदना भ्र चंद्रसेन सिरसट यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत वंदना भ्र चंद्रसेन सिरसट यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेउन मे. न्यायालयात अर्जदार यांचे नावे बारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
आज तारीख २०/०६/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.
प्रकरणात पुढील दिनांक २८/०८/२०२६

क. लिपीक
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, धारुर**

## टी सी हरवला आहे

**घनसावंगी येथील ऋतुजा नरहरी आढाव हिची बारावी पास विज्ञान ची संत रामदास महाविद्यालय घनसावंगीची टीसी घनसावंगी ते मोहपुरी प्रवासा दरम्यान हरवली आहे ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.**
**मो.-७०२०८५४१६१**

## कागदपत्र हरवले आहेत

**प्रतिक्षा अविंद्र घुगे या नावाचे इयत्ता बारावी पासचे मुळ कागदपत्रे टि.सी.व मार्क मेमो(गुणपत्रिका)हि कागदपत्रे असलेली बॅग दि.६/७/२०२६ रोजी संभाजीनगर ते लातुर या प्रवासादरम्यान हरवले आहेत.**
**कृपया सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधा.**
**मो.नं.९०७५७७२५२५**

## जाहीर नामा

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड

ई मेल -KAIJTAHSILDAR@GMAIL.COM
**एम ए जी विभाग** **दुरध्वनी क्र.** ०२२४५-२५२६४५
**क्र.२०२६/एमएजी/कावि/ ५०० दिनांक:- २३.०६.२०२६**

सर्व जनता मौजे वरपगाव (खटकळी) ता. केज यांना जाहीर केले जाते की, वरपगाव (खटकळी) येथील जन्म पावलेली इसम नामे कांबळे राजवीर गोविंद याचा जन्म दिनांक-१५/१०/२००९ रोजी मौजे खटकळी वरपगाव ता. केज येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायत वरपगाव ता. केज यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे गोविंद वचिष्ट कांबळे रा. वरपगाव ता. केज यांनी या कार्यालयास दि.०८.०६.२०२६ रोजी अर्ज व शथपत्र सादर करुन सोबत ग्राम पंचायत वरपगाव यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र, नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत वरपगाव ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
२/- कांबळे राजवीर गोविंद याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय वरपगाव ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी, केज**

## जाहीर नामा

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड

ई मेल -KAIJTAHSILDAR@GMAIL.COM
**एम ए जी विभाग** **दुरध्वनी क्र.** ०२२४५-२५२६४५
**क्र.२०२६/एमएजी/कावि/५०५ दिनांक:-१४.०७.२०२६**

सर्व जनता मौजे घाटेवाडी ता. केज यांना जाहीर केले जाते की, घाटेवाडी येथील जन्म पावलेली इसम नामे शिवराज बाबु यादव याचा जन्म दिनांक-१९/१०/२०२० रोजी मौजे घाटेवाडी ता. केज येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायत घाटेवाडी ता. केज यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे बाबु बापुराव यादव रा. घाटेवाडी ता. केज यांनी या कार्यालयास दि. १४.०७.२०२६ रोजी अर्ज व शथपत्र सादर करुन सोबत ग्राम पंचायत घाटेवाडी यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र, नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत घाटेवाडी ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
२/- शिवराज बाबु यादव याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय घाटेवाडी ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी, केज**

## जाहीर नामा

### तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड

**(दंड विभाग)**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात अर्जदार तालेब अमेर चाऊस रा. आहेरवाहेगाव ता. गेवराई जि. बीड यांनी अर्ज देवून अर्जदार अर्ज देवून अर्जदार यांची मूलगी आलिया तालेब चाऊस जन्म दिनांक २४.०२.२०२३ रोजी मादळमोही येथे झाला असून अनाधावनाने ग्रामपंचायत मादळमोही/आहेरवाहेगाव येथे नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म/मृत्यू आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.
करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो. स्टे गेवराई/चकलंबा/तलवाडा यांना कळिवण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी मादळमोही/आहेरवाहेगाव यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.
जन्म/ मृत्यू नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तालूका दंडाधिकारी गेवराई**

## जाहीर नामा

**कार्यालय नगर परिषद किल्ले धारूर जि. बीड**

क्र. २४३४ किनप / नांव लावणे (खरेदी खत आधारे )
**दिनांक:-**१४ जुलै २०२६

**अर्ज श्री. अमर अभिमन्यू चाळक**
**प्रकरण : घर नंबर १-११/१. दस्त क्रमांक ११२६/२०२६**
**श्री. अमर अभिमन्यू चाळक**
यांचे नांव लावने संबंधी सर्वांस जाहिर करण्यात येते की, **श्री. भगवान गणपती शिनगारे** ज्याचे नांव रजिस्टर महसुल जायदादला आहे. हे बदलण्यास तसम मजकुराने अर्ज दिला आहे. या विषयी ज्या कोणास तक्रार असेल त्यांनी या जाहीर नाम्याच्या प्रसिध्दी पासुन (१५) पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला तक्रार अर्ज द्यावा नसता मुदत संपल्यावर कायद्याप्रमाणे रजिस्टर महसुल जायदाद अर्जा प्रमाणे नांव बदलण्यास येईल. आणि मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
**चतुर सीमा-**
**पूर्व तीन फूट सामाईक रस्ता व लिहून देणार यांची समाईक जागा**
**पश्चिम छत्रभूज मायकर**
**दक्षिण रस्ता**
**उत्तर शामराव पुष्पराज बचाटे**
**पू. प. २१ फूट**
**द. उ. ४० फूट**

मुख्याधिकारी
नगरपरिषद किल्ले धारूर

## जाहीर नामा

**कार्यालय नगर परिषद किल्ले धारूर जि. बीड**

क्र. २४ ३५ किनप / नांव लावणे (खरेदी खत आधारे )
**दिनांक:-**१४ जुलै २०२६

**अर्ज १.जयराम चंद्रसेन वायकर २. शंकर चंद्रसेन वायकर**
**प्रकरण : ३-६५६/२. दस्त क्रमांक ९७८/२०२६**

**१.जयराम चंद्रसेन वायकर २. शंकर चंद्रसेन वायकर**
यांचे नांव लावने संबंधी सर्वांस जाहिर करण्यात येते की, **महेश रामचंद्र मोरे** ज्याचे नांव रजिस्टर महसुल जायदादला आहे. हे बदलण्यास तसम मजकुराने अर्ज दिला आहे. या विषयी ज्या कोणास तक्रार असेल त्यांनी या जाहीर नाम्याच्या प्रसिध्दी पासुन (१५) पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला तक्रार अर्ज द्यावा नसता मुदत संपल्यावर कायद्याप्रमाणे रजिस्टर महसुल जायदाद अर्जा प्रमाणे नांव बदलण्यास येईल. आणि मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
**चतुर सीमा-**
**पूर्व चंद्रकांत लिंबाजी फावडे**
**पश्चिम १५ फुटाचा रस्ता**
**दक्षिण पांडुरंग खंडू गायके**
**उत्तर अशोक शिंदे**

मुख्याधिकारी
नगरपरिषद किल्ले धारूर

## जाहीर नामा

**कार्यालय नगर परिषद किल्ले धारूर जि. बीड**

क्र. २४३३ किनप / नांव लावणे (खरेदी खत आधारे )
**दिनांक:-**१४ जुलै २०२६

**अर्ज -शामराव पुष्पराज बचाटे**
**घर नंबर ( १-११/१ )**
**दस्त क्रमांक ११२६/ २०२६**

**१.शामराव पुष्पराज बचाटे**
यांचे नांव लावने संबंधी सर्वांस जाहिर करण्यात येते की, **भगवान गणपती शिनगारे** ज्याचे नांव रजिस्टर महसुल जायदादला आहे. हे बदलण्यास तसम मजकुराने अर्ज दिला आहे. या विषयी ज्या कोणास तक्रार असेल त्यांनी या जाहीर नाम्याच्या प्रसिध्दी पासुन (१५) पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला तक्रार अर्ज द्यावा नसता मुदत संपल्यावर कायद्याप्रमाणे रजिस्टर महसुल जायदाद अर्जा प्रमाणे नांव बदलण्यास येईल. आणि मग कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
**चतुर सीमा-**
**पूर्व - तीन फूट समाईक रस्ता व लिहून देणार यांची समाईक जागा**
**पश्चिम बळीराम शेळके**
**दक्षिण भारत दादाराव शिनगारे**
**उत्तर अमर अभिमन्यू चाळक**
**पू. प. २१ फुट व द उ ४० फूट**

मुख्याधिकारी
नगरपरिषद किल्ले धारूर

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**

**ख,खत P.R कार्ड**

**प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)**
**अर्जदाराचे नाव: मंदा संतोष गुंजाळ**
**पत्ता/राहणार: बीड**
**सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.०३/०५/२४३**
**सव्हे नं.-**
**तरफ-**
**प्लाटॅ क्रं-**
**पैकी क्षेत्र - ३७.०८ चौ. मी.**
**वर श्री/ रोहिदास दगडू नाईकवाडे व इतर**
**बीड**
**चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.**

चतु: सिमा
पूर्व -श्री तुकाराम दगडू गुंजाळ
पश्चिम- रस्ता
दक्षिण- रस्ता
उत्तर- चव्हाण यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाली चौकशी अर्ज १३७/२०२६**
**निशाणी ४/ क**

१.सखाराम पिता तुकाराम चोले वय ६५ वर्षे धंदा शेती आसोला ता धारूर जि बीड
२.नवनाथ पिता तुकाराम चोले वय ५५ वर्षे धंदा शेती रा. आसोला ता धारूर जि बीड
३.जालिंदर पिता तुकाराम चोले वय ५० वर्षे धंदा शेती रा. आस-ोला ता धारूर जि बीड
४.रुक्मिन भ्र श्रीराम केंद्रे वय ५२ वर्षे धंदा घरकाम रा उमराई ता अंबाजोगाई जि बीड
५.सुमन भ्र राजाभाऊ केंद्र वय ४८ वर्षे धंदा घरकाम रा लाडेवडगांव ता केज जि बीड

**) अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही ) सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्वारे असे कळिवण्यात येते की, ज्या पेक्षा मयत क १ किसनाबाई भ्र तुकाराम बोले रा. मौजे आसोला ता. धारूर जि.बीड याचे दिनांक १५/०९/२०२५ रोजी निधन झालेले आहे. व मयत क २ तुकाराम पिता मोकिंदा चोले रा.मौजे आसोला ता धारूर जि बीड याचे दिनांक २५/१०/२०१५ त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. मयत क १ किसनाबाई भ्र तुकाराम चोले व मयत क २ तुकाराम पिता मोकिंदा चोले याचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता अर्जदार हे मयत क १ किसनाबाई भ्र तुकाराम चोले व मयत क २ तुकाराम पिता मोकिंदा चोले यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसाचे आत स्वत अथवा या मे न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामा योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेउन मे न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी
आज तारीख २५/०६/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला
प्रकरणात पुढील दिनांक ३१/०८/२०२६

क. लिपीक
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, धारुर**

## पान ४ वरून

**जिल्हा**

**परिषदेत सभापतींना ..**

आसन व्यवस्था, प्रोटोकॉल आणि पदाधिकाऱ्यांना दिला जाणारा मान यावरही नागरिकांचे लक्ष गेले. त्यामुळे या विषयावरील चर्चा अधिकच तीव्र झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पदाचा सन्मान, शासकीय शिष्टाचार आणि प्रोटोकॉल यांना विशेष महत्त्व दिले जाते. पदाधिकाऱ्यांच्या अधिकारांसह त्यांच्या मान-सन्मानाचे जतन करणे ही संस्थेची जबाबदारी मानली जाते. त्यामुळे भविष्यातील सर्वसाधारण सभांमध्ये विषय समिती सभापतींसाठी स्वतंत्र व मानाचे आसन निश्चित करणे, तसेच वरिष्ठतेनुसार आसन व्यवस्था करण्याबाबत स्पष्ट नियमावली तयार होईल का असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. आगामी काळात महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा या सभागृहातील प्रोटोकॉल, आसन व्यवस्था आणि प्रशासनिक शिष्टाचाराबाबत कोणते बदल करतात, याकडे आता पदाधिकारी, नगरसेवक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**ऐतिहासिक निर्णयांचा...**

जोगदंड कोषाध्यक्ष : भीमाशंकर नवनाथ शिंदे सहकोषाध्यक्ष : मल्हारी अंकुश जोगदंड मार्गदर्शक : नगरसेवक मालुभैय्या जोगदंड भारत भैय्या जोगदंड संजय जोगदंड विशाल वसंत नरसिंगे विलास बाबुराव घोलप खंडू नागनाथ वाघमारे महादू राम माने राजकुमार प्रकाश जोगदंड, बाबू रोहिदास जोगदंड, बैठकीत उपस्थित नागरिकांनी या निर्णयांचे स्वागत करत, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना साजेशी, शिस्तबद्ध, सामाजिक आणि साहित्यप्रधान जयंती साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.यंदा वर्गणीमुक्त, डीजेमुक्त आणि साहित्यदिंडीच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्याचा अंबाजोगाईचा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी आदर्श ठरणार, अशी भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.

**तलवाडा पशु वैद्यकीय...**

करणे हे सर्व काम शिकाऊ मुले आणि कंपाऊंडर कडुनच करून घ्यावी लागते. शेतकऱ्याच्या म्हशीला, गाईला काय झाले आहे हे न कळताच औषध दिले जात आसल्याची चर्चा आहे. दवाखान्यात महत्त्वाची इंजेक्शन्स, सलाईन, शस्त्रक्रियेची साधने उपलब्ध असून देखील मिळत नसल्याचे पशु पालकातून चर्चेला उधाण येऊ लागले आहे रात्री बे रात्रीच्या वेळी डॉ. अभावी उपचार मिळत नसल्याने जनावरे मृतमुखी पडत आसल्याचे देखील पक्षु पालक बोलतांना ऐकावयास मिळत आहे. जर आसे घडत असेल तर यास जबाबदार कोण?
तलवाडा पक्षु वैधकिय दवाखान्यात कुणी वालीच उरला नाही

## पान १ वरून

**सिव्हिलमध्ये**

**काय गोंधळ...**प्रकार पुन्हा आढळल्यास थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येईल अशी तंबी देखील डॉ.सोळंके यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिली

**बीड जिल्ह्यावर भर पावसाळ्यात कोरड्या दुष्काळाची ..**

खर्च करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण व अशक्य झाले आहे. बीड जिल्ह्यावर भर पावसाळ्यात कोरड्या दुष्काळाची छाया पसरली आसल्याने मायबाप सरकारने थोडी माया दाखवत शेतकऱ्यांच्या खालील मागण्यांकडे तात्काळ लक्ष देऊन न्याय द्यावा : १.) सरसकट कर्ज मुक्ती करण्यात यावी, २) कृषी विभागामार्फत नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये भरीव आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी. ३). दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना मोफत अथवा सवलतीच्या दरात बियाणे व खते उपलब्ध करून द्यावीत. ४) शेतकऱ्यांच्या शेतीपंपांची वीज दिवसा बारा तास देण्यात यावी, चालू खरीप हंगामातील शेती कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे. सदर गंभीर परिस्थितीचा विचार करून आम्हाला लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने, बाळू डहाळे, सुनिता गिल यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली

**२ ० कि . मी . अंतरातील,चारचाकी ..**

यांना या टोल नाक्यावरून सारखे येणे जाणे करावे लागत आहे. या दरम्यान सदरील टोल नाक्यावर प्रत्येक फेरीदरम्यान टोल वसूल केला जातो. ही बाब अन्यकारक असून प्रत्येक वेळी टोल वसुली करणे म्हणजे स्थानिकांची आर्थिक लूटमार केल्यासारखेच आहे. प्रशासनाने तात्काळ संबंधित टोल कंपनीला पत्रव्यवहार करून टोलनाक्याच्या कार्यक्षेत्रातील २० किलोमीटर अंतरावरील शेतकऱ्यांच्या चार चाकी वाहनांना पूर्णपणे टोलमुक्ती देण्यात यावी. या मागणीसाठी काल मंगळवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ११-३० वाजण्याच्या दरम्यान क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक शेतकरी व वाहन चालक-मालक यांनी उमरी टोल नाक्यावर चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान संबंधित टोलनाका कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारून संबंधित टोलनाका कंपनी व प्रशासनास वरील मागणी अनुसार कळवून आठ दिवसांत वरिष्ठांच्या अहवाल-ानुसार कार्यवाही करण्यात येईल. असे आश्वासन दिले□.
या लेखी निवेदनावर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, अजय वाघमारे, दादासाहेब गुंड, बाबासाहेब देशमुख, अमोल चौधरी, मोहन ढाणे, बालाजी घुले यांच्यासह २४ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**प्रभाग क्रमांक ७ मधील वारंवार वीज खंडित ..**

लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.
या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील वीजवाहिन्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित कराव्यात, आवश्यक असल्यास डीपीचे स्थलांतर करावे तसेच वाढलेला विद्युत भार कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.
तसेच, समस्या त्वरित न सोडवल्यास नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

**आईच्या कष्टाचे चीज, नेकनूरचा ...**

अपार कष्टाचे अखेर चीज झाले असून, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर नेकनूर येथील प्रतीक ज्योती महादेव शिंदे याने वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. फिलीपिन्स देशातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून त्याने डॉक्टर होण्याचे आपले स्वप्न साकार केले आहे. या यशामुळे संपूर्ण बीड जिल्ह्याचे नाव उज्वल झाले असून, शिक्षणातही जिल्हा अग्रेसर असल्याचे या भूमिपुत्राने दाखवून दिले आहे. प्रतीक शिंदे याचे मूळ गाव बीड तालुक्यातील नेकनूर हे आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण नेकनूरमध्येच पूर्ण झाले. त्यानंतर त्याने

**विजेच्या वारंवार खंडित पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; ..**

त्यांना दर्जेदार वीजपुरवठा मिळत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून नदीपात्रातील वीजवाहिन्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित कराव्यात किंवा चुनगल्ली येथील डीपीचे स्थलांतर करून पर्यायी ठिकाणी नवीन डीपी उभारावी. तसेच पाणीपुरवठ्याच्या वाढत्या भारामुळे डीपीवर येणारा अतिरिक्त लोड कमी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत तातडीने निर्णय न झाल्यास प्रभागातील नागरिक लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. तसेच अंधारामुळे कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनावर नगरसेवक जगदीश गुरखुडे आणि नगरसेविका सौ. भाग्यश्री सागर देशपांडे यांच्या स्वाक्षऱ्या असून महावितरण कार्यालयाने त्याची नोंद घेतली आहे.

**यवतमाळमधील वाढत्या गुन्हेगारीविरोधात चांदोरे नगरचे नागरिक ..**

नगर परिसराचा वाढता विस्तार आणि लोकसंख्या लक्षात घेता, या भागात एक स्वतंत्र पोलीस चौकी अत्यंत आवश्यक झाली आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी

लोकनायक

बुधवार दि १५ जुलै२०२६

३

# 'लोकराज्य' मासिकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा उलटी छापल्याने संताप; जबाबदार

# अधिकारी व मुख्य सचिवांना निलंबित करण्याची यवतमाळात मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –**
महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'लोकराज्य' मासिकाच्या एप्रिल २०२६ च्या अंकात भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा उलटी छापण्यात आल्याचा अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अक्षम्य चुकीमुळे आंबेडकरी जनतेसह संपूर्ण बहुजन समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत यवतमाळ येथे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, राज्यपाल आणि मुख्य सचिवांना निवेदन सादर करण्यात आले असून, दोषी अधिकारी व मुख्य सचिवांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'लोकराज्य' या शासकीय अधिकृत मासिकाच्या एप्रिल २०२६ च्या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एक फोटो प्रसिद्ध करण्यात आला आहे. मात्र, हा फोटो उलटा (रिव्हर्स/मिरर इमेज) छापण्यात आला आहे.आंदोलकांच्या प्रमुख मागण्या:
या घटनेच्या निषेधार्थ यवतमाळ येथील शिष्टमंडळाने शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत, तात्काळ निलंबन व चौकशी, 'लोकराज्य' मासिकाचे संपादक, प्रकाशक, आर्ट डायरेक्टर, प्रूफ रीडर आणि या संपूर्ण विभागाचे प्रमुख असणारे संबंधित सचिव/मुख्य सचिव यांना तात्काळ निलंबित करून त्यांची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात यावी.महाराष्ट्र शासनाने सर्व प्रमुख वृत्तपत्रे आणि शासकीय माध्यमांद्वारे या अक्षम्य चुकीबद्दल संपूर्ण राज्याची व देशाची जाहीर माफी मागावी. एप्रिल २०२६ चे सर्व अंक बाजारातून व शासकीय कार्यालयांतून तात्काळ परत मागविण्यात यावेत आणि त्याजागी माफीच्या मजकुरासह सुधारित आवृत्ती छापण्यात यावी.




न्यायिक चौकशी: हा प्रकार नेमका कोणामुळे आणि कोणत्या हेतूने झाला, याची सखोल 'न्यायिक चौकशी' करण्यात यावी.४८ तासांचा अल्टिमेटम 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका विशिष्ट समाजाचे नेते नसून ते संपूर्ण देशाचे शिल्पकार आहेत. त्यांचा अपमान हा देशाचा आणि संविधानाचा अपमान आहे,' अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. सामाजिक न्यायाची भूमिका घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाने या प्रकरणी पुढील ४८ तासांच्या आत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदन सादर करताना यवतमाळ येथील प्रमुख पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते ॲड. जयसिंह चव्हाण, उमेश मेश्राम, आनंद भगत, सिद्धार्थ भवरे, मिलिंद रामटेके, काशिनाथ गजभिये, रवींद्र कांबळे, अभिषेक गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
आता या संवेदनशील प्रकरणावर राज्य शासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.ऐतिहासिक वस्तुस्थितीशी छेडछाड छापण्यात आलेल्या फोटोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे डाव्या हाताने लिहिताना दिसत आहेत. परंतु, ऐतिहासिक वस्तु-स्थितीनुसार बाबासाहेब हे उजव्या हाताने लिहीत असत. यावरून हा फोटो मुद्दामहून आडवा फिरवून (फ्लिप करून) छापल्याचे स्पष्ट होत आहे.
यंत्रणेच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह: कोणतेही शासकीय मासिक प्रकाशित होण्यापूर्वी ते मजकूर, संपादन, आर्ट, प्रूफ आणि अंतिम मान्यता अशा किमान ४ ते ५ विविध कडक तपासणीच्या टप्प्यांतून जाते. एवढ्या स्तरांवर तपासणी होऊनही अशी गंभीर चूक कशी काय होऊ शकते? त्यामुळे ही केवळ छपाईतील चूक नसून जाणून-बुजून केलेले कृत्य असल्याचा संशय व्यक्त होत आहे.'हे बहुजनांच्या संयमाची परीक्षा पाहणारे षडयंत्र'
निवेदनाद्वारे आंदोलकांनी तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. 'ही केवळ तांत्रिक किंवा छपाईतील चूक नाही, तर हा राष्ट्रीय महा-पुरुषाचा आणि देशाच्या राज्यघटनेचा अवमान आहे. देशाच्या निर्मात्याच्या प्रतिमेशी केलेली ही टिंगल असून, १३० कोटी भारतीयांच्या आणि विशेषतः बहुजन समाजाच्या भावना दुखावण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे. एवढ्या वरिष्ठ स्तरावर तपासणी होऊनही जर ही चूक प्रशासनाच्या लक्षात आली नसेल, तर यामागे मोठे षडयंत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही,' असे निवेदनात म्हटले आहे.

---

# धोकादायक आणि जीर्ण इमारतीतून अध्यापनाचे धडे

## नव्या इमारतीचे बांधकाम करा

**लोकनायक वृत्तसेवा**
तालुक्यातील करंजी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी केंद्राच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत.शाळेतील ४ वर्ग खोल्या आणि गावातील अंगणवाड्यापैकी तीन केंद्रांच्या इमारती धोकादायक आणि जीर्ण अवस्थेत आहेत.यामुळे या ठिकाणी सुसज्ज आणि नव्या इमारतीचे बांधकाम करण्यात यावे,या संदर्भातील निवेदन गावातील पदाधिकाऱ्यांनी संवर्ग विकास अधिकारी संजय नैताम यांच्या मार्फतीने मुख्य कार्यपालन अधिकारी यांना दिले आहे.
गोंडपिपरी तालुक्यातील करंजी हे मोठ्या गावापैकी एक गाव.गावची लोकसंख्या पाच



हजाराच्या आसपास आहे.अशातच शाळकरी विद्यार्थी आणि अंगणवाडी केंद्रातील बालकांची संख्या मोठी आहे.मात्र गावात वर्गखोली आणि अंगणवाडी केंद्राच्या इमारती धोकादायक आहेत.इमारतीला भेगा गेल्या आहेत.वर्ग खोल्यात पाणी गळते.गतवर्षीच्या तुलनेत यंदा जि.प.विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.यामुळे नव्या इमारतीचे बांधकाम करण्याचे निवेदन गावातील शिष्टमंडळाने दिले आहे.या शिष्टमंडळात माजी उपसरपंच सारनाथ बक्षी,प्रशासकीय समितीचे सदस्य समीर निमगडे ,निखिल बामणे,सामाजिक कार्यकर्ते राकेश चापले,वैभव निमगडे आणि बादल देऊरमल्ले यांचा समावेश होता.
सद्या शाळेत १७० विद्यार्थी आहेत.पटसंख्या लक्षात घेता एक वर्गखोलीचे बांधकाम अत्यंत आवश्यक आहे.वर्गखोल्या जीर्ण असल्याच्या बाबतीतला पाठपुरावा शिक्षण विभागाला केला आहे.

> **जि.प.शाळा वर्गखोली आणि अंगणवाडी केंद्राच्या जीर्ण इमारतीबाबत यापूर्वी अनेकदा पाठपुरावा केला आहे.दोन्ही विभागाच्या इमारती धोकादायक असल्यामुळे तातडीने मंजूर करून बांधकाम करण्यात यावे.**
> **– समीर निमगडे,सदस्य प्रशासकीय समिती,ग्रा.पं.करंजी.**

> **करंजीतील ३ अंगणवाडी केंद्राच्या इमारती जीर्ण आहेत.यापूर्वी प्रस्ताव दिल्याची माहिती आहे.नव्याने प्रस्ताव मागितला आहे.**
> **– अश्विनी मेश्राम,पर्यवेक्षिका,महिला व बालकल्याण,पं.स.गोंडपिपरी**

---

# पांदण रस्त्यासाठी एका शेतकऱ्याने केला आत्मदहनाचा दुसऱ्याने विषारी औषध प्राशन करण्याचा प्रयत्न

**लोकनायक वृत्तसेवा**
माजलगाव – तालुक्यातील सादोळा शिवारातील गटनं १७०मधुन जाणाऱ्या पांदण रस्त्या वरील अतिक्रमण हटवुन तो पांदण रस्ता खुला करण्यात यावा अशी मागणी गटातील शेतकरी किशोर एरंडे,भागवत एरंडे यांनी अनेक महिन्यांपासून तहसील,उपविभागीय कार्यालया कडे केली होती.
त्यांच्या म्हणण्यानुसार हा रस्ता भुमी अभिलेख विभागाच्या नकाशात आहे पण महसूल विभागाने चुकीचा पंचनामा करून रस्ता खुला करण्यासाठी नकार दिला असा आरोप केला,मागणी कडे दुर्लक्ष केले जात असल्याने १४जुलै मंगळवार रोजी च्या सकाळी कायार्लयालनील वेळेत एका शेतकऱ्याने अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न तर दुसऱ्याने विषारी औषध प्राशन करण्याचा प्रयत्न केला होता, पोलीसांनी तात्काळ



त्यांना ताब्यात घेतल्याने अनर्थ टळला आहे.
कारकुनी पेन(मेख) सर्व अधिकारी एक*
पांदण रस्ते किंवा शेती पोहच रस्त्यावर कुणीही त्यावरील अतिक्रमणे केल्याची तक्रार दाखल झाली असेल तर त्या बाबतीत महसूल विभागाने तातडीने अहवाल मागवून सत्य आढळून आले तर रस्ता खुला करण्यात येईल अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती,यावर स्थानिक महसुल विभाग चाणाक्षपणे अतिक्रमणे धारकांचे हिताचे पंचनामे करण्याचे काम करीत आहेत असे सांगितले जाते यालाच म्हणतात'कारकुनी मेख त्यातून सर्व अधिकारी एक'

---

# संत चोखामेळा महाराजांची ऐतिहासिक पालखी बीड जिल्ह्यात दाखल; विठ्ठलनामाच्या गजरात भक्तिमय वातावरण

**लोकनायक वृत्तसेवा**
वारकरी संप्रदायातील समता, भक्ती आणि मानवतेचा संदेश देणारे संतश्रेष्ठ संत चोखामेळा महाराज यांच्या जन्मभूमी मेहुणपुरी (ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) येथून पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी निघालेल्या ऐतिहासिक पालखीचे बीड जिल्ह्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. सुमारे शंभर वर्षांपूर्वी बंद पडलेली ही पालखी नव्या जोमाने पुन्हा सुरू झाल्याने वारकरी भक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.
हातात भगव्या पताका, टाळ-मृदुंगाचा अखंड गजर, 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'जय जय रामकृष्ण हरी' च्या जयघोषात पालखी पुढे सरकत असून संपूर्ण



परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. पालखीसोबत आकर्षक रथामध्ये संत चोखामेळा महाराजांशी संबंधित ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह ठेवण्यात आला असून, भाविक त्याचे दर्शन घेत आहेत.
बीड जिल्ह्यातील रांजणी (ता. गेवराई) येथे पा-लखीचा मुक्काम झाला. यावेळी परिसरातील हजारो भाविकांनी पालखीचे दर्शन घेत वारकऱ्यांचे स्वागत केले. याप्रसंगी वारकऱ्यांसोबत चर्चा केली , या संवादातून समजले की, शंभर वर्षांपासून बंद असलेली ही ऐतिहासिक पालखी पुन्हा सुरू करण्यासाठी अनेकांनी अथक परिश्रम घेतले.
या ऐतिहासिक उपक्रमात गोपाल राजे जाधव , अनिल काकडे, श्रीकांत कुलकर्णी, वसंत उगले, आनंद राजे, माहादू राजे यांच्यासह अनेक वारकरी, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांचे मोलाचे योगदान लाभले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे संत चोखामेळा महाराजांचा समतेचा आणि भक्तीचा संदेश पुन्हा एकदा जनमानसात पोहोचत आहे.
आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने निघालेली ही पालखी केवळ धार्मिक परंपरा नसून संत चोखामेळा महाराजांच्या समता, श्रद्धा आणि मानवतेच्या विचारांचा जिवंत वारसा असल्याची भावना भाविकांकडून व्यक्त होत आहे.

---

# स्व. शंकरराव चव्हाण यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

## आरोग्य शिबिरात २५० रुग्णांची मोफत तपासणी

**लोकनायक वृत्तसेवा**
केंद्रीय मंत्री व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांची १०६ वी जयंती शंकरराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय व शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी आरोग्य शिबिर, वृक्षारोपण आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविम कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव गणेश चिखले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मिनाक्षी तागडे, कोशिश फाउंडेशनचे संयोजक कपिल वानखेडे, ईश्वर ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य निकिता रामटेके, संध्या ठाकरे, यामिनी घोडमारे, किशोर बक्सरिया, मुख्याध्यापिका विना पांडे, रजनी वाहने, विद्या कसारे, डॉ. फिरोज अन्सारी, डॉ. सचिन गोडबोले, आदिती वाढीवे, सरिता दुकाती आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात स्व. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली याप्रसंगी सरपंच



मिनाक्षी तागडे, कोशिश फाउंडेशनचे संयोजक कपिल वानखेडे आणि मुख्याध्यापिका विद्या कासरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वरून हॉस्पिटल मल्टीस-पेशालिटी व कोशिश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात २५० रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा
संदेश देत शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले तसेच विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्याचे निशुल्क वाटप करण्यात आले.
यावेळी मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी स्व. शंकरराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा दिला त्या म्हणाल्या शंकरराव चव्हाण हे अत्यंत शिस्तप्रिय नेते होते. केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी
अनेक महत्त्वाचे व धाडसी निर्णय घेतले. विशेषतः शिक्षण आणि जलसिंचन क्षेत्रात त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे.
कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश चिखले यांनी
शंकरराव चव्हाण एक महान नेते होते यांनी लावलेली शिस्त व आजच्या तरुण पिढीने त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कार्य ठेऊन राष्ट्र उभारण्यासाठी कार्य करावे असे आवाहन केले यावेळी इतर मान्यवरांनी त्यांच्या जीवनप्रवासावर विस्तृत प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत मोहोड यांनी केले, संचालन केशव तभाने यांनी तर आभार नीरज मिश्रा यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन कोरडे, चंद्रकांत गायकवाड, प्रविण साबळे, राजेंद्र गूळरांधे, संगीता राऊत, उमेश झाडे, नरेंद्र बुटोलिया, प्रमोद इंगळे, अनिल भास्कर, सुरेखा चिखले, पुष्पा बढिये, गीता जालंदर, मनीषा
सिंगनजुडे, सुनील जालंदर, अभय मिश्रा, भोला बक्सरिया, किशोर निकोसे आणि शोभा घोडीले यांनी सहकार्य केले.

---

# अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा

**लोकनायक वृत्तसेवा**
प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत 'प्रति थेंब अधिक पीक' संकल्पनेतून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी दि. १ जुलै ते ३१ जुलै या काल-ावधीत कृषी विभागाच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तालुक्यातील अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी




सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन लोह्याचे तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांनी केले आहे.

सदर मोहिमेद्वारे अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर सूक्ष्म सिंचनासाठी दि. १ ते ३१ जुलै या कालावधी दरम्यान अर्ज करून शासनाकडून ९० टक्क्यांपर्यंत मिळणाऱ्या अनुदानाचा लाभ घ्यावा. तालुक्यातील प्रत्येक गाव-ागावांत विशेष शेतकरी मेळावे, जनजागृती कार्यक्रम व अर्ज भरण्याचे कॅम्प आयोजित करण्यात येणार असून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपल्या सहायक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी कार्यालय येथे संपर्क साधून अर्ज सादर करावेत. सदरील विशेष मोहिमेचा लाभ अधिक अधिक अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी घेऊन

लोकनायक
बुधवार दि १५ जुलै२०२६
४

# जिल्हा परिषदेत सभापतींना व्यासपीठावर मानाचे स्थान; जालना मनपात मात्र सर्वसामान्य नगरसेवकांप्रमाणे वागणूक


**जालना महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रोटोकॉल, पदाधिकाऱ्यांचा सन्मान आणि सभागृहातील आसन व्यवस्था या विषयावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. महानगरपालिकेतील विविध विषय समित्यांच्या सभापतींना त्यांच्या पदाला साजेसा मान न देता सर्वसामान्य नगरसेवकांप्रमाणे बसविण्यात आल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले असून, हा केवळ आसन व्यवस्थेचा नव्हे तर पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याचे मत व्यक्त होत आहे.**

## सभापतींना स्वतंत्र दालन, पण सभागृहात मानाचे स्थान नाही ?

**लोकनायक वृत्तसेवा –** महानगरपालिकेतील स्थायी समिती, बांधकाम, शिक्षण, महिला व बालकल्याण, आरोग्य, नियोजन व विकास आदी विषय समित्यांचे सभापती हे त्या-त्या विभागाचे प्रमुख असतात. संबंधित समितीचे कामकाज, बैठका, धोरणात्मक निर्णय, विकासकामांचा आढावा आणि प्रशासनावर देखरेख ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यामुळे सर्वसाधारण सभेत त्यांना स्वतंत्र व मानाचे स्थान मिळणे ही केवळ औपचारिकता नसून संस्थेच्या प्रोटोकॉलचा भाग मानला जातो.

विशेष म्हणजे जिल्ह्याचे, 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेत अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह सर्व विषय समित्यांच्या सभापतींना व्यासपीठावर किंवा स्वतंत्र मानाच्या आसनावर स्थान दिले जाते. सभापती हे पदाधिकारी असल्याने त्यांच्या पदाचा

जालना मनपा सर्वसाधारण सभा: विषय समिती सभापतींच्या मान-सन्मानाचा विसर!




सन्मान राखला जातो. त्यामुळे महानगरपालिकेतही अशाच प्रकारची व्यवस्था अपेक्षित असताना जालना मनपात मात्र त्याचा अभाव जाणवल्याची चर्चा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, जालना महानगरपालिकेत सर्व विषय समित्यांच्या सभापतींसाठी तसेच स्थायी समिती सभापतींसाठी स्वतंत्र दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या दालनांचे सुशोभीकरणही सुरू असून काही दालने पूर्ण झाल्याने संबंधित सभापती तेथून नियमितपणे आपले प्रशासकीय कामकाजही पार पाडत आहेत. स्वतंत्र कार्यालयाची सुविधा दिली जाते, मात्र सर्वसाधारण सभेत त्यांच्या पदाला अनुरूप स्वतंत्र आसन व्यवस्था का नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

जरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये सर्वसाधारण



सभेतील आसन व्यवस्थेबाबत स्पष्ट तरतूद नसली, तरी विषय समित्यांच्या सभापतींना कायद्याने मान्यता प्राप्त पदाधिकारी म्हणून अधिकार आणि जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्यांना सर्वसामान्य नगरसेवकांप्रमाणे वागणूक देणे हे पदाच्या प्रतिष्ठेला साजेसे नसल्याचे मत जाणकार व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, यंदाच्या सर्वसाधारण सभेत आसन व्यवस्थेबाबतही अनेक प्रश्न उपस्थित झाले. प्रथमच निवडून आलेल्या नगरसेवकांना प्रोटोकॉलनुसार वरिष्ठ व अनुभवी नगरसेवकांच्या मागील रांगेत स्थान दिले जाते. मात्र जालना महानगरपालिकेच्या सभेत कोणत्याही निश्चित क्रमाविना सदस्य आपल्या सोयीने आसनस्थ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही राजकीय नेत्यांचे वारसदार किंवा प्रभावशाली व्यक्तींना पुढील रांगेत स्थान मिळाल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. विशेष म्हणजे, जालना महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच लोकसभा आणि विधानसभेच्या धर्तीवर सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. महानगरपालिकेचा कारभार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचावा, हा या उपक्रमामागील उद्देश असला तरी थेट प्रक्षेपणामुळे सभागृहातील **पान २ वर**

रविकांत दानम
मो. 9404040522

# तलवाडा पशु वैद्यकीय दवाखान्याला कुणी वाली उरले का?पशुसंवर्धन विभागाचा सावळा गोंधळ शेतकऱ्यांच्या माथी

## शिकाऊ पोरांच्या जीवावर? दवाखान्यात कुणीही वाली उरला नाही

**लोकनायक वृत्तसेवा –** तालुक्यातील तलवाडा येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी (१) म्हणजे कागदावर आदर्श दवाखाना पण प्रत्यक्षात मात्र जनावरांसाठी यमसदन बनला आहे. येथे तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने गावातील शिकाऊ मुले, कंपाऊंडर






यांच्याच जीवावर संपूर्ण दवखाना चालवला जात आहे. गुराढोरांचे जीव धोक्यात घालून सुरू असलेल्या या प्रकाराकडे जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे पूर्ण दुर्लक्ष असल्याचे निदर्शनास येत आहे,पशु वैधकीय दवाखाना म्हणजे चोविस तास सेवा असणे अपेक्षित. परंतु मागील अनेक महिन्यांपासून येथे कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने आलटून पालटून येणारे अधिकारी १० मिनिटे बसून निघून जातात जनावरांना उपचारासाठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्याला शिकाऊ मुलांच्या हातून इंजेक्शन देणे, ड्रिप लावणे, प्रसूती **पान २ वर**

# ऐतिहासिक निर्णयांचा धडाका; अंबाजोगाईतील साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती यंदा वर्गणीमुक्त, डीजेमुक्त आणि साहित्यदिंडीने गाजणार!

**लोकनायक वृत्तसेवा –** अंबाजोगाई शहरातील साठेनगर-परळवेस येथे लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बैठकीत यंदाच्या जयंतीबाबत अनेक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचे शहरासह संपूर्ण बीड जिल्ह्यातून सोशल मीडियावर आणि दूरध्वनीद्वारे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे.

बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले की, यंदाची अण्णाभाऊ साठे जयंती पूर्णपणे वर्गणीमुक्त असेल. शहरात किंवा बाहेरून कोणाकडूनही वर्गणी गोळा केली जाणार नाही. जयंती लोकसहभागातून आणि नियोजनबद्ध पद्धतीने साजरी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

तसेच, जयंती डीजेमुक्त साजरी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ध्वनीप्रदूषणाला आळा घालत सांस्कृतिक आणि वैचारिक वातावरणात जयंती साजरी करण्यावर भर देण्यात आला आहे.

याशिवाय, १ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहरातून भव्य साहित्य दिंडी काढण्यात येणार असून, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि सामाजिक विचारांचा जागर करण्यात येणार आहे. ही दिंडी जयंतीचे प्रमुख आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

बैठकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे वर्गणीबाबतचा कठोर निर्णय. आयोजकांनी स्पष्ट केले की, कोणाकडूनही वर्गणी मागितली जाणार नाही. तसेच वर्गणी देणे किंवा घेणे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याची भूमिका समितीने घेतली आहे.कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष : पंकज भैया मस्के उपाध्यक्ष : शिवाजी बालासाहेब जोगदंड सचिव : लखन अरुण जोगदंड सहसचिव : केशव बळीराम **पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा –** २५ सात २० २६ आतुरता आषाढी सोहळ्याची सद्गुरु श्री बाळूमामा देवालय ट्रस्ट आदमापूर तालुका भुदरगड जिल्हा कोल्हापूर मोजेपाली येथील कानोबा नगर या ठिकाणी बाळूमामा मंदिर मेंढी माऊली समाधी मंदिर पाली सकाळी आठ ते नऊ पांडुरंग महाराज रांजण यांचं प्रवचन होईल एकादशी दिवशी सकाळी ठीक नऊ वाजता वेळेवर आरती होईल नंतर महाप्रसाद फराळ ची सोय आहे तरी भाविक भक्तांनी आरती व फराळा चा लाभ घ्यावा सकाळी नव्हते अकरा भजनाचा कार्यक्रम होईलदिनांक २५ सात २० २६ आतुरता आषाढी सोहळ्याची सद्गुरु श्री बाळूमामा देवालय ट्रस्ट **पान २ वर**

# शितल ठोंबरे यांचे अपघाती निधन

## अरुंद रस्त्याने पुन्हा घेतला एक बळी

**लोकनायक वृत्तसेवा –** धारूर शहरातील शितल ठोंबरे यांचे आज सकाळी तेलगाव रोड वरील विश्रामगृहाजवळ गाडीने पाठीमागून धडक दिल्याने अपघाती निधन झाले आहे. धारूर पंचायत समिती तिचे माजी सभापती हनुमंत बप्पा नागरगोजे यांची कन्या शितल नागरगोजे (ठोंबरे )या सकाळी रोजच्या नियमाप्रमाणे मॉर्निंग वॉक करण्यासाठी फिरावयास तेलगाव रोड वरती गेलेल्या होत्या यावेळी धारूर कडून तेलगाव कडे जाणाऱ्या स्कार्पिओ गाडीने त्यांना पाठीमागून जोराची धडक दिल्याने त्यांचे अपघाती निधन झाले आहे अरुंद रस्त्याने पुन्हा एकदा एक बळी घेतला आहे रस्ता अरुंद असल्याने वारंवार



अपघाताच्या घटना घडत असून जीवित हानी व वित हानी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

शहरातून घाटपाटीकडे मोठ्या प्रमाणावर नागरिक सकाळी फिरावयास जातात शितल ठोंबरे हे देखील आपल्या भाऊजईसह फिरावयास गेल्या होत्या यावेळी त्यांना पाठीमागून वेगाने आलेल्या स्कार्पिओने जोराची धडक दिली यातच त्यांचे निधन झाले आहे त्यांच्या या निधनाने **पान २ वर**

# श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरून संत वामनभाऊ महाराज पालखीचे आ.सुरेश धस यांच्या उपस्थितीत भक्तिमय प्रस्थान;

## आ. सुरेश धस यांनी पायी चालत विविध दिंडींचे केले स्वागत

**लोकनायक वृत्तसेवा –** आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरून सोमवारी (दि. १३ जुलै) संत श्री वामनभाऊ महाराज यांच्या पारंपरिक पालखी-दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. 'ज्ञानोबा-तुकाराम', 'पांडुरंग हरी' आणि 'विठ्ठल-रुक्मिणी'च्या अखंड नामघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



प्रस्थानापूर्वी संत वामनभाऊ महाराजांच्या पावन पादुकांचे विधिवत पूजन, दुग्धाभिषेक, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि महाआरती यांसह विविध धार्मिक विधी संपन्न झाले. भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा गजर आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात हजारो वारकरी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाले.

यावेळी आष्टी-पाटोदा-शिरूर (कासार) मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी संत वामनभाऊ महाराजांच्या पादुकांचे पूजन करून समाधीचे दर्शन घेतले. त्यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या सुखरूप, मंगलमय आणि भक्तिरसपूर्ण वारीसाठी शुभेच्छा दिल्या.

गहिनीनाथ **पान २ वर**

# सलग २७ वर्षांपासून रक्तदान करत स्वत:चा वाढदिवस साजरा करणारा अवलिया निलेशकुमार राठौर

लोकनायक वृत्तसेवा – प्रत्येक जन आपला वाढदिवस हा वेग वेगळ्या प्रकारे साजरा करतात. त्या प्रमाणे निलेशकुमार राठौर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शासकीय रुग्णालय बीड येथे स्वइच्छेने जाऊन रक्तदान करून आपला आपला वाढदिवस साजरा केला. आता पर्यंत त्यांनी २७



वेळेस रक्तदान केले. दरवर्षी ते आपला वाढदिवस रक्तदान करून साजरा करतात.

करू या दान रक्ताचे फेडू या ऋण समाजाचे या उक्ती प्रमाणे ते नेहमी रक्तदान करतात. या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना त्यांनी सांगितले कि, मी एक रक्तदाता आहे आणि मला माणूस

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दूल लोकनंायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com